**परिपत्रक**

क्र.पोउपमनि / विसुवि / आस्था-१/ प्रतिनि-निवड-प्रक्रिया-२०२२(ऑनलाईन अर्ज)/२०२२/२०५७ दि. ०७/०९/२०२२

संदर्भ :- महाराष्ट्र शासन, गृहविभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.एसएसए-०५१८/प्र.क्र.२२१/विशा- ४, दि.१६/०८/२०१८

विषय :- विशेष सुरक्षा विभाग प्रतिनियुक्ती निवड प्रक्रिया - २०२२.

*********

उपरोक्त संदर्भाधीन विषयास अनुसरुन कळविण्यात येत आहे की, आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अधिपत्याखालील विशेष सुरक्षा विभागामधील पोलीस अधिकारी / अंमलदारांची रिक्त पदे ऑनलाईन निवड प्रक्रियेने भरण्याकरीता निवड प्रक्रिया - २०२२ राबविण्यात येत आहे. त्याकरीता ईच्छुक पोलीस अधिकारी (नि:शस्त्र पोलीस निरीक्षक, नि:शस्त्र सहा.पोलीस निरीक्षक व नि:शस्त्र पोलीस उप निरीक्षक ) / अंमलदार यांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरुन मागविण्यात येणार आहेत.

विसुवि प्रतिनियुक्तीकरीता ईच्छुक पोलीस अधिकारी / अंमलदार यांनी भरावयाचा ऑनलाईन अर्ज व जाहिरात **http://www.mahapolice.gov.in** या संकेतस्थळावर (वेब साईट) दि.०८/०९/२०२२ ते १८/०९/२०२२ रोजीपर्यंत उपलब्ध राहील.

निवड प्रक्रिया - २०२२ करीताची जाहिरात माहितीकरीता सोबत जोडली असुन सर्व घटकप्रमुखांना कळविण्यात येत आहे की त्यांनी त्यांचे आस्थापनेवरील सर्व पोलीस अधिकारी / अंमलदार यांना जाहिरातीबाबत अवगत करावे, हि विनंती.

**( एस. एस. बुरसे )**
पोलीस अधीक्षक ( प्रशासन )
विशेष पोलीस महानिरीक्षक ( व्ही.आय.पी.सुरक्षा)
विशेष सुरक्षा विभाग, दादर, मुंबई यांचे करीता.

प्रति,

मा.पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह).
मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.राज्य,मुंबई (सस्नेह).
मा.पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके / लोहमार्ग म.राज्य, मुंबई. (सस्नेह).
मा.आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, म.राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, म.राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक, आ.गु.शा, मुंबई / सायबर, मुंबई / वाहतुक मुंबई / द.वि.प.म.राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त ( लोहमार्ग मुंबई सह बृहन्मुंबई वगळून )
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक / महाराष्ट गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / नक्षल विरोधी अभियान, नागपूर / फोर्स वन, मुंबई / मा.राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई / ना.ह.सं. म.राज्य, मुंबई.
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर.
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्ग / राज्य पोलीस नियंत्रण कक्ष, मुंबई सह)
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालये / युओटिसी, नागपूर / डि.टी.एस.नाशिक.
समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १३

# विशेष सुरक्षा विभागामध्ये प्रतिनियुक्ती करीता ऑनलाईन निवड प्रक्रिया - २०२२

( नि:शस्त्र पोलीस निरीक्षक / नि:शस्त्र सहा.पोलीस निरीक्षक / नि:शस्त्र पोलीस उप निरीक्षक)
( पोलीस शिपाई / पोलीस नाईक / पोलीस हवालदार )

**जाहिरात** दिनांक :- ०७/०९/२०२२

## सूचना / माहितीपत्रक
## आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई

संदर्भ :- महाराष्ट्र शासन गृह विभाग, शुध्दीपत्रक क्र.एसएसए-०५१८/प्र.क्र.२२१/विशा-४, दि.१६ ऑगस्ट २०१८

विषय :- विशेष सुरक्षा विभाग येथे प्रतिनियुक्तीबाबत.

********

राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई अंतर्गत विशेष सुरक्षा विभाग येथे संदर्भाधीन शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी धारण करीत असलेले महाराष्ट्र पोलीस दलातील इच्छुक पोलीस अधिकारी ( रा.रा.पो.बल वगळून ) / पोलीस अंमलदार ( जिल्हा पोलीस दल व रा.रा.पो.बल सह ) यांचेकडून विशेष सुरक्षा विभागामधील रिक्त पदे प्रतिनियुक्तीने भरण्याकरीता ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहे.

याबाबतचा ऑनलाईन अर्ज http://www.mahapolice.gov.in/ या संकेतस्थळावर (वेब साईट) तसेच आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, जुने विधान भवन, दुसरा मजला, शहीद भगतसिंग रोड, कुलाबा, मुंबई - ४०० ००१ येथील नोटीस बोर्डवर उपलब्ध राहील. सदर अर्जाच्या अनुषंगाने पात्र पोलीस अधिकारी / अंमलदार यांचेकरीता निवड प्रक्रियेसाठी शारिरीक क्षमता चाचणी घेण्यात येणार आहे.

१ विशेष सुरक्षा विभागामध्ये प्रतिनियुक्तीने नेमणुकीसाठी अर्जदाराने एकदाच अर्ज सादर करावयाचा आहे. एकापेक्षा जास्त अर्जांचा विचार करण्यात येणार नाही. तसेच एकापेक्षा अधिक विसुवि घटकामध्ये सादर केलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

२ पोलीस अधिकारी / अंमलदारांनी ऑनलाईन अर्जामध्ये त्यांच्या पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपूर्ण, अचूक व खरी माहीती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहिल्यास व त्यामुळे निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवारांची राहील.

३ अर्जदाराने शारीरिक क्षमता चाचणीच्या वेळी त्यांचे ओळखपत्र व त्यांनी ऑनलाईन भरलेल्या अर्जाची छापिल ( Print ) प्रत सोबत घेवून येणे बंधनकारक असेल. अन्यथा उमेदवारांस शारिरीक क्षमता चाचणीसाठी प्रवेश दिला जाणार नाही.

P.T.O.

४ निवड प्रक्रिये अंतर्गत घेण्यात येणा-या वैद्यकिय तपासणी दरम्यान उमेदवार मानसिक रुग्ण, जुना आजार, उच्च रक्तदाब, उच्च मधुमेह, उच्च ताण इत्यादी सततच्या आजाराने ग्रस्त असल्याचे निष्पन्न झाल्यास उमेदवारास अपात्र करण्यात येईल.

५ शारीरिक क्षमता चाचणीची प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर उमेदवारांची गुणवत्ता यादी त्यांचे मुळ घटकानुसार http://www.mahapolice.gov.in/ या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

६ निवड प्रक्रीयेत पात्र ठरलेले पोलीस अधिकारी / अंमलदारांना ते ऑनलाईन अर्ज करतेवेळी ते ज्या पदावर कार्यरत होते त्याच पदावर त्यांना प्रतिनियुक्ती देण्यात येईल.

७ गुणवत्ता यादीतील उमेदवारांची निवड तात्पुरती ( Provisional selection ) असेल, गुणवत्ता यादीमध्ये उमेदवारांच्या नावाचा समावेश झाला म्हणुन प्रतिनियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे समजण्यात येवू नये. गुणवत्ता यादीनुसार पदे भरण्याचा अधिकार विशेष पोलीस महानिरीक्षक, (व्ही.आय.पी.सुरक्षा ) विशेष सुरक्षा विभाग, मुंबई यांना आहे त्याबाबत अंमलदारांना कोणताही दावा करण्याचा हक्क राहणार नाही.

८ विशेष सुरक्षा विभागासाठी शारीरिक क्षमता चाचणी पात्रतेनुसार गुणवत्ताक्रमाने येणा-या उमेदवारांना विशेष सुरक्षा विभागासाठी आवश्यक असलेले PSO Basic प्रशिक्षण यशस्विरित्या उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे. सदरचे प्रशिक्षण उत्तीर्ण झालेल्या अधिकारी / अंमलदारांचाच विशेष सुरक्षा विभागामध्ये प्रतिनियुक्तीकरिता विचार करण्यात येईल.

९ PSO Basic प्रशिक्षणात अनुत्तीर्ण झाल्यास पोलीस अधिकारी / अंमलदार यांना विसुवि प्रतिनियुक्तीकरीता अपात्र ठरविले जाईल.

१० विशेष सुरक्षा विभागामध्ये जसजसे पदे रिक्त होतील त्याप्रमाणे अंमलदारांना प्रतिनियुक्ती दिली जाईल.

११ निवड प्रक्रियेत पात्र उमेदवारांना ( अंमलदारांना ) त्यांच्या मुळ घटकासाठी दर्शविण्यात आलेल्या विसुवि घटकामध्येच प्रतिनियुक्ती होईल, इतर विसुवि घटकामध्ये त्यांच्या प्रतिनियुक्तीसाठी विचार केला जाणार नाही.

१२ विशेष सुरक्षा विभागात अंमलदाराची निवड झाल्यावर त्यांचा वि.सु.वि.प्रतिनियुक्तीचा कालावधी हा ५ वर्षाचा असेल ( शारिरीक चाचणी आणि गोळीबार चाचणी उत्तीर्ण होण्याच्या अटींच्या अधीन राहुन) आणि ५ वर्षाच्या पुढे अंमलदाराला कोणत्याही परिस्थितीमध्ये मुदतवाढ मिळणार नाही.

१३ विशेष सुरक्षा विभाग अंतर्गत विहित कालावधी पुर्ण झाल्यावर कोणतीही पूर्वसुचना न देता अंमलदाराला मुळ घटकात परत पाठविण्याचे सर्वस्वी अधिकार विशेष पोलीस महानिरीक्षक (व्ही.आय.पी.सुरक्षा ) विशेष सुरक्षा विभाग, दादर, मुंबई यांना राहतील.

१४ अधिकारी यांचेकरीता वि.सु.वि. विहित कालावधी ३ वर्षाचा असेल, कालावधी पुर्ण झाल्यावर सार्वत्रिक बदल्यामध्ये त्यांची इतरत्र बदली होणेबाबत मा.पोलीस महासंचालक, म.राज्य मुंबई कार्यालयास कळविण्यात येईल.

१५ विसुवि मध्ये कार्यकाळ पुर्ण झाल्यानंतर मुदतवाढ मिळणेकरीता कोणत्याही प्रकारचा बाह्य प्रभाव आणल्यास (संबंधित पोलीस अधिकारी / अंमलदार ) हे शिस्तभंगाच्या कार्यवाहीकरीता पात्र ठरतील.

१६ निवड प्रक्रियेत अंशत: बदल करणे, स्थगित करणे, रद्द करणे तसेच रिक्त पदांच्या एकुण संख्येमध्ये बदल करणे याबाबतचे सर्वस्वी अधिकार विशेष पोलीस महानिरीक्षक, ( व्ही.आय.पी.सुरक्षा), विशेष सुरक्षा विभाग, दादर, मुंबई यांना राहतील.

## विशेष सुरक्षा विभागातील पोलीस हवालदार / पोलीस नाईक / पोलीस शिपाई यांची रिक्त पदांची माहीती खालीलप्रमाणे आहे :-

| विसुवि मुंबई घटक | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र | मुळ घटक | पो.हवा. | पो.ना. | पो.शि. |
| १ | मुंबई शहर | ४१ | ३९ | ५३ |
| २ | ठाणे शहर | ४ | ७ | ३ |
| ३ | नवी मुंबई | २ | ५ | ५ |
| ४ | ठाणे ग्रामीण | २ | ३ | ३ |
| ५ | लोहमार्ग मुंबई | ४ | ९ | ३ |
| ६ | मीरा भाईंदर | ६ | ५ | ५ |
| ७ | पालघर | १ | १ | १ |
| ८ | रायगड | १ | १ | २ |
| ९ | रत्नागिरी | ० | १ | ० |
| १० | सिंधुदुर्ग | १ | ० | ० |
| ११ | रारापोबल गट क्र.८मुंबई | २१ | २० | ४१ |
| १२ | रारापोबल गट क्र.११ नवी मुंबई | १७ | ३३ | ० |
| | एकुण | १०० | १२४ | ११६ |

| विसुवि पुणे घटक | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र | मुळ घटक | पो.हवा. | पो.ना. | पो.शि. |
| १ | पुणे शहर | ५ | १३ | ६ |
| २ | पुणे ग्रामीण | १ | २ | ३ |
| ३ | पिंपरी चिंचवड | २ | २ | ३ |
| ४ | लोहमार्ग पुणे | १ | ० | ३ |
| ५ | सोलापुर शहर | १ | ० | ० |
| ६ | कोल्हापूर | ० | ० | १ |
| ७ | सांगली | १ | ० | ० |
| ८ | सातारा | १ | ० | १ |
| ९ | सोलापुर ग्रामीण | १ | ० | ० |
| १० | रारापोबल गट क्र.१ पुणे | ३ | ३ | ७ |
| ११ | रारापोबल गट क्र.२ पुणे | २ | ३ | ५ |
| १२ | रारापोबल गट क्र.५ दौंड | १ | २ | ४ |
| १३ | रारापोबल गट क्र.७ दौंड | १ | २ | ४ |
| १४ | रारापोबल गट क्र.१० सोलापूर | २ | २ | ३ |
| | एकूण | २२ | २९ | ४० |

P.T.O.

| विसुवि नाशिक घटक | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र | मुळ घटक | पो.हवा. | पो.ना. | पो.शि. |
| १ | नाशिक शहर | २ | ३ | ४ |
| २ | नाशिक ग्रामीण | २ | ३ | ३ |
| ३ | अहमदनगर | १ | १ | १ |
| ४ | धुळे | १ | ० | ० |
| ५ | नंदुरबार | ० | ० | ० |
| ६ | रारापोबल गट क्र.६ धुळे | १ | २ | २ |
| | **एकूण** | ७ | ९ | १० |

| विसुवि जळगाव घटक | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र | मुळ घटक | पो.हवा. | पो.ना. | पो.शि. |
| १ | जळगांव | २ | २ | १ |
| २ | अकोला | ० | १ | ० |
| ३ | बुलढाणा | १ | १ | ० |
| ४ | रारापोबल गट क्र.६ धुळे | २ | २ | २ |
| | एकुण | ५ | ६ | ३ |

| विसुवि औरंगाबाद घटक | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र | मुळ घटक | पो.हवा. | पो.ना. | पो.शि. |
| १ | औरंगाबाद शहर | २ | २ | २ |
| २ | औरंगाबाद ग्रामीण | १ | २ | १ |
| ३ | उस्मानाबाद | ० | ० | ० |
| ४ | बीड | ० | १ | ० |
| ५ | जालना | १ | १ | ० |
| ६ | रारापोबल गट क्र.३ जालना | १ | ३ | २ |
| | **एकूण** | ५ | ९ | ५ |

| विसुवि नांदेड घटक | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र | मुळ घटक | पो.हवा. | पो.ना. | पो.शि. |
| १ | नांदेड | १ | १ | २ |
| २ | हिंगोली | ० | १ | ० |
| ३ | परभणी | १ | १ | ० |
| ४ | लातुर | ० | १ | ० |
| ५ | रारापोबल गट क्र.१२ हिंगोली | १ | १ | १ |
| | **एकूण** | ३ | ५ | ३ |

| विसुवि नागपूर घटक | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र | मुळ घटक | पो.हवा. | पो.ना. | पो.शि. |
| १ | नागपुर शहर | ५ | ७ | २ |
| २ | चद्रपुर | १ | ० | १ |
| ३ | गोंदिया | १ | ० | १ |
| ४ | भंडारा | १ | ० | १ |
| ५ | अमरावती ग्रामीण | १ | ० | ० |
| ६ | वर्धा | ० | १ | ० |
| ७ | यवतमाळ | ० | १ | ० |
| ८ | वाशिम | ० | ० | ० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९ | नागपुर ग्रामीण | २ | २ | ० |
| १० | अमरावती शहर | १ | ० | ० |
| ११ | रारापोबल गट क्र.४नागपूर | ४ | ८ | ४ |
| १२ | रारापोबल गट क्र.९ अमरावती | ३ | २ | १ |
| | **एकूण** | १९ | २१ | १० |

**विसुवि अहेरी घटक**

| अ.क्र | मुळ घटक | पो.हवा. | पो.ना. | पो.शि. |
|---|---|---|---|---|
| १ | गडचिरोली | ३ | ९ | ६ |
| २ | रारापोबल गट क्र.१३ गडचिरोली | ४ | ६ | २ |
| | **एकूण** | ७ | १५ | ८ |

**विशेष सुरक्षा विभागातील नि:शस्त्र पोलीस निरीक्षक / नि:शस्त्र सहा. पोलीस निरीक्षक / पोलीस उप निरीक्षक यांची रिक्त पदांची माहीती खालीलप्रमाणे आहे :-**

| पद | रिक्त पदे |
|---|---|
| नि:शस्त्र पोलीस निरीक्षक | ०७ |
| नि:शस्त्र सहा.पोलीस निरीक्षक | १२ |
| नि:शस्त्र पोलीस उप निरीक्षक | ३४० |
| **एकुण** | **३५९** |

**अर्जदारांनी सादर केलेल्या ऑनलाईन अर्जांच्या छाननीनंतर पात्र ठरलेल्या अर्जदारांसाठी शारीरिक क्षमता चाचणीकरीता निश्चित करण्यात आलेली तारीख सर्व घटकांना या कार्यालयाव्दारे परिपत्रक जारी करुन कळविण्यात येईल.**

| | |
|---|---|
| **अर्ज भरुन सादर करण्याची तारीख:** | **दि. ०८ / ०९ /२०२२ ते १८ / ०९ / २०२२ ( रात्रौ १२.०० पर्यंत )** |
| **अर्जदारांकरीता वयोमर्यादा :** | **संदर्भाधीन शासन निर्णयामध्ये नमूद वयोमर्यादा दि. १८ / ०९ / २०२२ रोजीपर्यंत ग्राह्य धरण्यात येईल.** |

*** महाराष्ट्रात वेळोवेळी उद्भवत असलेल्या कोरोना संसर्ग प्रादुर्भावामुळे सदर भरती प्रक्रियेच्या तारखांमध्ये बदल होण्याची शक्यता आहे.**

**आयुक्त,**
**राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,**
**मुंबई यांचेकरीता**